# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 22/05/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर टोल नाका समोर माथनी शिवार मौदा येथे दिनांक २१/०५/२०२३ चे ००.३५ वा. ते ०१.२५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांना मुखबीर द्वारे माहीती मिळाली की, टोल नाका येथे काही इसम अवैधरीत्या जनावरांची वाहतुक करीत आहे. त्यानुसार टोल नाका येथे भरधाव वेगाने येणाऱ्या टाटा पिकअप यांना थांबवले व तिन्ही टाटा पिकअप गाडीचे चालक व क्लीनर हे धावत आले व ढकलढकुल करून पळुन गेले गाडीची पाहणी केली असता १) टाटा पिकअप गाडी क्र. एम एच.– ३६ ए.ए– २६४९ किंमती ३०००००/– रू गोवंश १० गोवंश प्रत्येकी किंमती १५०००/–रू प्रमाणे १,५०,०००/–रू, २) टाटा पिकअप गाडी क्र. एम एच.– ३३ जी– १२१४ किंमती ३००००/– रू १२ गोवंश प्रत्येकी १८००००/–रू, ३) पिकअप गाडी क्र. एम एच.– ३६ एए– १३४४ चा ३०००००/–रू १० गोवंश १५०००/–रू. प्रमाणे १५००००/–रूपयाचा मुद्देमाल सदर वाहनात बोलेरो पिकअप गाडी मध्ये जनावरांच्या शिंगाला, मानेला, पायाला दोराने बांधुन कोणत्याही चारापाण्याची व्यवस्था न करता क्रुरतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने एकुण तिन्ही टाटा गाडी किंमती अंदाजे ९००,०००/–रू. एकुण ३२ जनावरे प्रत्येकी किंमती १५०००/–रू प्रमाणे ४८००००/– रू मिळुन आल्याने सदर जनावरे यांना चारापाणी सोयीकरीता सुखरूप गोरक्षण संस्था पिंपळगाव ता. लाखनि जि. भंडारा लेखी पत्र देवुन दाखल करण्यात आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि. विजयसिंग ठाकुर पोलीस स्टेशन मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, ३४ भादवि. सहकलम ११(१) (डी), ५अ, ५ ब, ९, ११९ प्राणी संरक्षण कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक खराबे मो. नं. ९९२३४३८३५५ हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर रामाळेश्वर वार्ड रामटेक येथे दिनांक १६/०५/२०२३ चे २२.०० वा. ते २२.१५ वा. दरम्यान आरोपी मोटरसायकल पल्सर २२० एम. एच. –३१ ई. झेड –७७७२ च्या चालकाने त्याचे ताब्यातील सदर मोटरसायकल हे भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन विरूध्द दिशेने येणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम. एच.–३१ ए.टि.–९१११ ला समोरून ठोस मारल्याने सदर स्प्लेंडर मोटरसायकल वरील फिर्यादीच्या घरा शेजारील भाऊ सचिन जांभुळकर, त्याची पत्नी, त्याचा मुलगा तथागत व त्याची मुलगी हे रोडवर पडुन जखमी झाले. त्याचे गंभीर जखमी होण्यास कारणीभुत होवुन **मृतक नामे –तथागत सचिन जांभुळकर, वय ९ वर्ष रा. आंबेडकर वार्ड रामटेक** याचे मरणास कारणीभुत झाला तसेच जखमीचे उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. यावले पो.स्टे. रामटेक मो. नं. ९०११६५५२८४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा कोंढाळी ते काटोल रोड येथे दिनांक १४/०५/२०२३ चे

09/00 वा. दरम्यान यातील मोटरसायकल चालक मृतक व आरोपी नामे –सुनील रमन सोमकुवर वय ३४ वर्ष रा. भागेमारी ता सावनेर जि. नागपुर हा आपली मोटरसायकल क्र. एम. एच. –४०/सी.जी. ७७६१ ने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन त्याची मोटरसायकल स्लिप झाल्याने स्वत:हा पडुन जखमी झाला जखमीला पोलीसांना माहीती होताच त्याला पी. एच. सी कोंढाळी येथे प्रथम उपचाराकरीता नेले जखमीच्या डोक्याला जास्त मार असल्याने त्याला नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले सदर जखमीचा उपचार सुरू असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस नायक सुनिल दौलतराव ठोंबरे रा. पोलीस स्टेशन कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४(अ) भा.द.वी सहकलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. सुरजुसे मो. क्र. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा नरखेड येथे **यातील मृतक नामे –मेघराज रामरावजी केने, वय ५९ वर्ष, रा. नरखेड** हा घरी आंब्याच्या झाडावर आंबे तोडण्याकरिता झाडावर चढला असता, झाडाची फांदी तुटुन जमीनीवर खाली पडल्याने डोक्याला मार लागला. मृतक मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कु. अंकीता मेघराज केने, वय २६ वर्ष, रा. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ शैलेश डोंगरदिवे /१५९८ पो. स्टे. नरखेड मो. ७०५७४०१५९८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**